ePaper

# ...तर छत्रपती संभाजी महाराज रायगडावर चल म्हणत टकमक टोक दाखवतील : उद्धव ठाकरे




| वर्ष - 6 | अंक - 65 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार | दिनांक 9 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- पुणे पोलिसांना मोठं यश; संशयित गुंड सौरभ महाकाळला अटक!
- आता पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचे तीन आमदार!
- पिंपळे गुरवमध्ये महिलेवर बलात्कार करून जीवे मारण्याची धमकी



मोहम्मद पैगंबर यांच्या अपमानाचा बदला घेण्याची धमकी अल कायदाकडून देण्यात आली आहे. मुस्लिम देशांनी विरोध दर्शवल्यानं भाजप नेतृत्वाला प्रवक्त्यांवर कारवाई करावी लागली. सत्ताधारी पक्षानं आपल्याच प्रवक्त्यांच्या विधानांपासून फारकत घेण्याची वेळ पहिल्यांदाच आली. हा संपूर्ण प्रकार दुर्दैवी आहे. कोणीतरी उच्चारलेल्या काही शब्दांमुळे धर्माबद्दलची श्रद्धा कमी होईल, इतका कोणताच धर्म कमजोर नसतो.

-**प्रियंका चतुर्वेदी,** शिवसेना खासदार



बांधावरची मदत ज्यांना स्मरत नाही, पेट्रोल-डिझेलचे दर जे स्वत: कमी करीत नाही, त्यांनी दुसऱ्याना 'अच्छे दिन' सांगावे, म्हणजे लोका सांगे ब्रम्हज्ञान आणि...! माझे पुन्हा सवाल आहेत, शेतकऱ्या ना मदत केव्हा करणार? पेट्रोल-डिझेलचे दर केव्हा कमी करणार?" "असो, संभाजीनगरचे नामकरण, पाण्याचा प्रश्न, रस्त्यांचे प्रश्न, विकासाची एखादी नवीन योजना यापैकी काही तरी ठोस मिळेल, अशी उगाच त्यांची अपेक्षा होती. पण, संभाजीनगरवासियांना मिळाले काय तर पुन्हा एकदा टोमणे आणि फक्त टोमणे.

-**देवेंद्र फडणवीस** विरोधी पक्ष नेते.

## शॉर्ट न्यूज »

### तीन दिवसांत कोकणात पूर्वमोसमी पाऊस जोर धरणार



**।पुणे।** प्रतिकूल स्थितीमुळेनैर्ऋत्य मोसमी पावसाचा महाराष्ट्रातील प्रवेश सध्या रखडला असला, तरी १० किवा ११ जूनला दक्षिण कोकणात पूर्वमोसमी पाऊस जोर धरणार आहे. त्यामुळे मोसमी पावसाच्या प्रवेशासाठी अनुकूल स्थिती निर्माण होण्याचे संकेत आहेत. सध्या राज्यात बहुतांश भागात तापमानाचा पारा वाढला आहे. मात्र, अनेक भागांत पावसाळी वातावरण निर्माण होऊन तापमानात घट होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.अरबी समुद्रातून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांचा वेग मंदावला असल्याने गेल्या काही दिवसांपासून मोसमी पावसाचा प्रवास थांबला आहे. अरबी समुद्राच्या बाजूने २९ मे रोजी केरळमध्ये प्रवेश आणि त्यानंतर ३१ मे रोजी कर्नाटकातील कारवारपर्यंत मजल मारलेल्या मोसमी पावसाने गेल्या आठ दिवसांपासून कोणतीही प्रगती केली नाही. गोव्याच्या सीमेपासून काही अंतरावरच तो थकबला आहे. बंगालच्या उपसागराच्या बाजूनेही त्याची प्रगती गेल्या पाच दिवसांपासून थांबली आहे.

### विधान परिषद निवडणूक : पक्षश्रेष्ठींकडून लांडे, पानसरे, बहल अन् वाघेरेंच्याही हातावर तुरी

# भाजपाने करुन दाखवले, राष्ट्रवादीने केवळ झुलवले!

## 25 वर्षांतील सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडकरांच्या पदरी निराशा



**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।**

**पक्षाच्या स्थापनेपासून सुमारे २५ वर्षे सत्तेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक नेत्यांना महामंडळ किंवा राज्यमंत्री दर्जाचे पद मिळाले नाही. मात्र, पाच वर्षे सत्ता दिलेल्या भाजपाने पिंपरी-चिंचवडमध्ये अनेक महत्त्वाची पदे दिली. त्यामुळे 'स्थानिक नेतृत्त्वाला ताकद' देण्याच्या मुद्यावर "भाजपाने करुन दाखवले, पण राष्ट्रवादीने केवळ झुलवले" अशी खंत राष्ट्रवादीच्या गोटात व्यक्त केली जात आहे.**

राज्यात राज्यसभा, विधान परिषद आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. राज्यसभा निवडणुकीची रस्सीखेच सुरू असतानाच विधान परिषदेच्या १० जागांसाठी भाजपाने पाच उमेदवारांची घोषणा केली. त्यापैकी महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा उमा खापरे यांच्या उमेदवारीमुळे पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पक्षाच्या निष्ठावंत म्हणून खापरे यांना पहिल्यांदा प्रदेश महिला अध्यक्षा आणि आता विधान परिषदेवर संधी देण्यात आली. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थापनेपासून कार्यरत असलेल्या स्थानिक नेत्यांच्या पदरी गेल्या २५ वर्षांपासून केवळ निराशा पडली आहे.

माजी महापौर आझम पानसरे यांचा अपवाद वगळता माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल, माजी महापौर संजोग वाघेरे-पाटील यांना विधान परिषद अथवा महाविकास आघाडी सरकारमध्ये एखाद्या महामंडळावर संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, तसे झाले नाही.

याउलट, राज्यसभा खासदारपदी अमर साबळे, राज्य लोकलेखा समितीवर (राज्यमंत्री दर्जा) ॲड. सचिन पटवर्धन, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळावर अमित गोरखे, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी सदाशीव खाडे, उपमहापौरपदी शैलजा मोरे, केशव घोळवे, सत्तारुढ पक्षनेतेपदी एकनाथ पवार, नामदेव ढाके, स्थायी समितीवर विलास मडिगेरी यांसह विविध समिती, प्रदेश कार्यकारिणीवर भाजपाने शहरातील अनेकांना संधी दिली. यातून राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींनी काहीच बोध घेतला नाही का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### सक्षम स्थानिक नेतृत्त्वाअभावी महापालिका विजय कठीण...

➡ एकेकाळी राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये विधानसभा निवडणुकीत २०१४ मध्ये राष्ट्रवादीमुक्त शहर झाले. शहरातील तीन विधानसभा मतदार संघात विरोधी पक्षाने वर्चस्व ठेवले. २०१७ मध्ये महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीला पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर २०१९ मध्ये पिंपरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादीला यश मिळाले. मात्र, चिंचवड आणि भोसरीत अधिकृत उमेदवारही देता आला नाही. शहर राष्ट्रवादीत स्थानिक पातळीवर गट-तट निर्माण झाले आहेत. संपूर्ण शहराचे नेतृत्तव करु शकेल, असा एकही स्थानिक चेहरा समोर आलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. असे असताना प्रदेश नेतृत्त्वाने स्थानिक नेतृत्त्वाला ताकद देणे अपेक्षीत आहे. अन्यथा आगामी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीला विजय कठीण होणार आहे.

### एकेकाळी प्रदेश भाजपाचे पिंपरी-चिंचवडमध्ये बारीक लक्ष...

➡ विकासकामांच्या भूमिपुजनाच्या निमित्ताने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी नुकताच शहराचा दौरा केला. यावेळी भाजपाच्या प्रदेश नेतृत्त्वाचे शहरात लक्ष नाही. मात्र, आम्ही शहरात कायम येतो. विकासकामांत लक्ष असते, असे जाहीरपणे सांगितले. मात्र, भाजपाचे प्रदेश पातळीवरील नेत्यांची शहरात उठबस वाढली आहे. त्यामुळेच भाजपामधील स्थानिक नेतृत्त्वावर प्रचंड नाराज असलेला २५ ते ३० लोकांचा गट राष्ट्रवादीत प्रवेश करणार, असे जाहीरपणे सांगितले जात असतानाही अद्याप यश येताना दिसत नाही, यावर राष्ट्रवादीच्या प्रदेश नेतृत्त्वाने आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे.

## शॉर्ट न्यूज »

### बारावीत नापास : पुण्यात १९ वर्षीय तरुणाची आत्महत्या

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत बारावीचा निकाल जाहीर झाला. अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन करून आपला आनंद साजरा केला. दरम्यान पुण्यातील गरवारे महाविद्यालयात बारावी वाणिज्य शाखेत शिक्षण घेणाऱ्या एका तरुणानं टोकाचं पाऊल उचललं आहे. इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून त्यानं आत्महत्या केली आहे.

निखिल लक्ष्मण नाईक असं आत्महत्या करणाऱ्या १९ वर्षीय तरुणाचं नाव असून तो पुण्यातील श्रावणधारा वसाहत परिसराती रहिवासी होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निखिल लक्ष्मण नाईक हा आई, वडील आणि मोठा भाऊ यांच्या श्रावणधारा वसाहत परिसरात वास्तव्यास होता. त्याची आई घरकाम करते, तर वडील मोलमजुरीच काम करतात. मृत निखिल गरवारे महाविद्यालयात वाणिज्य शाखेत इयत्ता बारावीच्या वर्गात शिकत होता.

### सिद्धेश कांबळे उर्फ सौरभ महाकाळ याचे बिष्णोई टोळीशी कनेक्शन उघड

# पुणे पोलिसांना मोठं यश; संशयित गुंड सौरभ महाकाळला अटक!

### सौरभ महाकाळ मुसेवाला हत्या प्रकरणात संशयित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

पंजाबी गायक, काँग्रेस नेते सिद्धू मुसेवाला खून प्रकरणात ग्रामीण पोलिसांनी संशयित गुंड सिद्धेश कांबळे उर्फ सौरभ महाकाळ याला बुधवारी पकडले.

पंजाबमधील मानसा जिल्ह्यातील जवाहरके या गावात २९ मे रोजी मुसेवाला यांची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. मुसेवाला खून प्रकरणात पंजाब, राजस्थानमधील लॉरेन्स बिष्णोई टोळीचा हात असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले होते. मुसेवालावर गोळ्या झाडणाऱ्या दहा हल्लेखोरांची नावे निष्पन्न झाली आहेत. मंचरमधील गुंड संतोष जाधव आणि त्याचा साथीदार सौरभ महाकाळ



मुसेवाला हत्या प्रकरणात संशयित आरोपी आहेत.

संतोष जाधव आणि सौरभ महाकाळ यांनी गेल्या वर्षी आंबेगाव तालुक्यात ओंकार बाणखेले याचा वैमनस्यातून गोळ्या झाडून खून केला होता. तेव्हापासून दोघेजण पसार होते. जाधव आणि महाकाळ पंजाब, राजस्थानात पसार झाले होते. राजस्थानात खंडणीसाठी एका व्यावसायिकावर गोळीबार केल्या प्रकरणी जाधवला अटक करण्यात आली होती. राजस्थानातील कारागृहात तो लॉरेन्स बिष्णोई टोळीच्या संपर्कात आल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, मुसेवाला हत्या प्रकरणातील संशयित तसेच मोक्का कारवाईनंतर पसार झालेला आरोपी महाकाळ पुणे जिल्ह्यात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक शेळके आणि पथकाने त्याला ताब्यात घेतले. महाकाळला अटक करुन बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला २० जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. मुसेवाला खून प्रकरणात आतापर्यंत पंजाब पोलिसांनी तीन संशयितांना अटक केली आहे.

सिद्धू मुसेवाला यांना चार शसस्त्र सुरक्षारक्षकांची सुरक्षा पुरवण्यात आलेली. या सुरक्षेमध्ये कापत करुन पंजाबमध्ये नव्याने सत्तेत आलेल्या भगवंत मान सरकारने केवळ दोन सुरक्षारक्षक त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात केलेले. सिद्धू मुसेवाला यांच्याकडे

#### सिद्धू मुसेवालांवर 30 गोळ्या झाडल्या...

सिद्धू मुसेवाला यांची २९ मे २०२२ रोजी काही अज्ञात व्यक्तींनी गोळ्या झाडून हत्या केली. सिद्धू मुसेवाला आपल्या काळ्या रंगाच्या थार गाडीमध्ये दोन मित्रांसहीत प्रवास करत असताना हा हल्ला झाला. गुरविंदर सिंग आणि गुरप्रीत सिंग यांच्यासोबत जात असतानाच सिद्धू मुसेवालाच गाडी चालवत होते. घरापासून काही अंतरावर असताना अचानक सिद्धू मुसेवाला यांच्या गाडीवर अंदाधुंद गोळीबार करण्यात आला.

## अमेरिकेत चितारलेल्या व्यक्तिचित्रांचे पुण्यात प्रदर्शन; 'कार्त दे विझीत' चित्रप्रदर्शन आजपासून

### स्वातंत्र्यवीर सावरकर, रवींद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक यांच्या चित्रांसह 120 व्यक्तिचित्रे पुणेकरांना पाहता येणार

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

चारकोल पेपरवरील चित्रांच्या या प्रदर्शनात स्वातंत्र्यवीर सावरकर, रवींद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक यांच्या चित्रांसह १२० व्यक्तिचित्रे पुणेकरांना पाहता येणार आहेत. टाळेबंदीच्या काळात अमेरिकेमध्ये वास्तव्यास असताना चित्रकार शुभदा सहस्रबुद्धे यांनी कलेच्या माध्यमातून सकारात्मक ऊर्जा जागृत केली. 'कार्त दे विझीत' या त्यांनी चितारलेल्या व्यक्तिचित्रांचे प्रदर्शन शुक्रवारपासून पुण्यात भरविण्यात येत आहे.

भांडारकर रस्त्यावरील आर्ट टू डे आर्ट गॅलरी येथे रविवरपर्यंत (१२ जून) सकाळी अकरा ते सायंकाळी सायंकाळी सात या वेळात हे प्रदर्शन



टाळेबंदीच्या काळात अमेरिकेमध्ये वास्तव्यास असताना चित्रकार शुभदा सहस्रबुद्धे यांनी कलेच्या माध्यमातून सकारात्मक ऊर्जा जागृत केली. 'कार्त दे विझीत' या त्यांनी चितारलेल्या व्यक्तिचित्रांचे प्रदर्शन शुक्रवारपासून पुण्यात भरविण्यात येत आहे.

सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. चारकोल पेपरवरील चित्रांच्या या प्रदर्शनात स्वातंत्र्यवीर सावरकर, रवींद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक, इरफान खान, सचिन तेंडूलकर, कपिल देव, मधुबाला, श्रीदेवी यांच्या चित्रांसह १२० व्यक्तिचित्रे पुणेकरांना पाहता येणार आहेत, अशी माहिती शुभदा सहस्रबुद्धे यांनी दिली, गेली २३ वर्षे अमेरिकेमध्ये असलेल्या सहस्रबुद्धे सध्या पद्मावती येथे वास्त्यव्याला आहेत. अमेरिकेमध्ये असताना त्यांनी ही सर्व चित्रे साकारली आहेत.

> 'करोना काळात 'स्केच अ डे' या संकल्पनेतून सलग १४० दिवस विविध देशातील प्रभावी व्यक्तीमत्त्वाचे चित्र मी काढले. या संकल्पनेतून केवळ सकारात्मकतेचा प्रसार झाला आणि जगभरातील लोकांशी मी जोडले गेले. प्रत्येक चित्रासाठी अडीच तासांची मुदत देत मी स्वत:ला आव्हान दिले. डोळे, नाक, कान, ओठ ही प्रत्येकाची वैशिष्ट्ये सारखीच असतात. परंतु, बारीकसारीक बदलामुळे चेहऱ्याची ओळख पूर्णपणे बदलते. माझ्यासाठी चेहऱ्यावरचे भाव चित्रामध्ये आणण्याला सर्वोच्च प्राधान्य होते.'
>
> - शुभदा सहस्रबुद्धे, चित्रकार

## औंध आयटी पार्कमधील हॉटेलला आग



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

औंध आयटी पार्क येथील इमारतीच्या छतावर असणाऱ्या हॉटेलला आग लागली. आगीत हॉटेलमधील साहित्य जळून भस्मसात झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी एक ते दीड तासात आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. औंध येथील सानेवाडी परिसरात गायकवाड आयटी पार्क आहे. आयटी पार्कच्या छतावर एक हॉटेल असून बुधवारी सकाळी हॉटेलमध्ये आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. जवान तेथे घटनास्थळी पोहोचेपर्यंत आग भडकली. जवानांनी पाण्याचा मारा सुरू केला. तासाभरानंतर आग पूर्णपणे नियंत्रणात आली. आगीत कोणीही जखमी झाले नाही.

औंध येथील सानेवाडी परिसरात गायकवाड आयटी पार्क आहे. आयटी पार्कच्या छतावर एक हॉटेल असून बुधवारी सकाळी हॉटेलमध्ये आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. जवान तेथे घटनास्थळी पोहोचेपर्यंत आग भडकली.

## भाजपाकडून निष्ठावंतांना न्याय : पक्षाचे काम प्रामाणिकपणे केल्यास संधी मिळतेच

# आता पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचे तीन आमदार!

## स्थानिक नेतृत्त्वावर नाराज असलेल्यांना पक्षश्रेष्ठींचा सूचक संदेश!





**। पिंपरी । महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या स्थानिक नेतृत्त्वावर नाराज होवून राष्ट्रवादी किंवा अन्य पक्षांच्या वाटेवर असलेल्या नाराजांना पक्षश्रेष्ठींनी सूचक संदेश दिला आहे. पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या उमा खापरे यांना विधान परिषदेची उमेदवारी घोषित केली असून, नाराजांना बाहेर पडताना पुनर्विचार करावा लागेल, अशी स्थिती आहे. राज्यात रिक्त होणाऱ्या विधान परिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक लागली आहे. त्यापैकी पाच उमेदवारांनी घोषणा भाजपाकडून करण्यात आली. यापैकी भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा उमा खापरे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.

वास्तविक, उमा खापरे या भाजपा निष्ठावंत नेत्या आहेत. स्व. गोपिनाथ मुंडे समर्थक असलेल्या खापरे यांनी महापालिकेत दोन नगरसेवक म्हणून कार्यकाळ गाजवला आहे. २००१-०२ मध्ये खापरे महापालिकेत विरोधी पक्षनेत्या होत्या. मुंडे समर्थक, नगरसेविका, विरोधी पक्षनेत्या, महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव, प्रदेशाध्यक्षा असा राजकीय आलेख खापरे यांनी यशस्वी केला आहे.

भाजपामध्ये असल्यास संधी मिळू शकते, यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब करण्यास भाजपाचे प्रदेश नेतृत्व यशस्वी झाले आहे. यापूर्वी राज्यसभा खासदारपदी अमर साबळे, राज्य लोकलेखा समितीवर (राज्यमंत्री दर्जा) ॲड. सचिन पटवर्धन, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळावर अमित गोरखे, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी सदाशीव खाडे, उपमहापौरपदी शैलजा मोरे, केशव घोळवे, सत्तारुढ पक्षनेतेपदी एकनाथ पवार, नामदेव ढाके, स्थायी समितीवर विलास मडिगेरी यांसह विविध समिती, प्रदेश कार्यकारिणीवर भाजपाच्या निष्ठावंतांना संधी देण्यात आली. आता त्यामध्ये उमा खापरे यांना संधी देत भाजपा पक्षश्रेष्ठींनी निष्ठावंत कार्यकर्ता हाच पक्षाचा केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट केले आहे.

### नाराजांकडून प्रदेश नेतृत्वाशी 'कनेक्शन' अधिक मजबूत करण्याची तयारी...

सुमारे ८ वर्षे भाजपामध्ये काम करणारे बाबू नायर यांना पक्षाने स्वीकृत नगरसेवकपदी संधी दिली होती. मात्र, आता आगामी निवडणुकीच्या तोंडावर नायर यांनी पुन्हा काँग्रेसची वाट धरली. त्यामुळे भाजपाला मोठी गळती लागणार, अशी चर्चा सुरू झाली. असे असतानाही भाजपा पक्षश्रेष्ठींनी उमा खापरे यांना संधी देत राजकीय तळ्यात-मळ्यात करणाऱ्यांना सूचक संदेश दिला आहे. त्यामुळे भाजपात राहिल्यानंतर आपल्याला संधी मिळू शकते, असा विश्वास आता नाराजांना येवू लागल्यामुळे प्रदेश पातळीवर असलेले 'कनेक्शन' अधिक मजबूत करण्याची मानसिकता अनेकांनी केली आहे.

### फडणवीस यांचा सबुरीचा सल्ला किती महत्त्वाचा?

२०१७ मध्ये भाजपाची सत्ता महापालिकेत आली. त्यानंतर आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे या दोन्ही नेत्यांवर नाराज असलेल्या नगरसेवकांनी पक्षातून बाहेर पडण्याची तयारी केली. राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी जवळीक अनेकांनी वाढवली. याच काळात विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी नाराजांना सबुरीचा सल्ला दिला होता. यावर शहराच्या राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा झाली. त्यामुळे फडणवीस यांनी दिलेला सुबरीचा सल्ला किती महत्त्वाचा होता हे उमा खापरे यांच्या उमेदवारीवरुन सिद्ध झाले आहे. विशेष म्हणजे, फडणवीसांनी जो मॅसेज स्थानिक नाराजांना दिला होता, तो मॅसेज श्रीकांत भारतीय यांच्याकरवी आला होता, असे सांगितले जाते. योगायोगाने भारतीय यांनासुद्धा विधान परिषदेची उमेदवारी घोषित झाली आहे.

---

# समस्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष ; जलपर्णी, नदीप्रदूषण, प्रक्रिया न केलेले सांडपाणी, नद्या बुजवण्याचे प्रकार

## शहरातील वायूप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन अशा सर्वच बाबतीत पालिकेची उदासीनता

**। पिंपरी । महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**



नदीपात्रात सर्रास आढळून येणारी जलपर्णी, हजारोंच्या संख्येने वाहून येणारे मृतमासे, कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात सोडण्यात येणारे सांडपाणी, भराव टाकून नदी बुजवण्याचे प्रयत्न अशा अनेक प्रकारांमुळे पिंपरी-चिंचवड शहरात पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. तथापि, यासंदर्भात कठोर उपाययोजना करण्याऐवजी महापालिकेकडून त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. पर्यावरणीय सोहळे आयोजित करण्यातच पालिकेने धन्यता मानल्याचे दिसून येते.

पर्यावरणविषयक कामांसाठी पिंपरी पालिकेच्या वतीने दरवर्षी कोटय़वधी रूपये खर्च करण्यात येतात. तरीही पर्यावरणाची हेळसांड कायम असून जनजागृती केवळ कागदावरच राहिल्याचे आतापर्यंत दिसून येते. शहरातील वायूप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन अशा सर्वच बाबतीत पालिकेची उदासीनता आहे. नियोजनशून्य आणि भ्रष्ट कारभारामुळे पर्यावरणाचा सातत्याने बोजवारा उडाला आहे. नद्यांची अवस्था गटारांप्रमाणे बनली आहे. प्रक्रिया न करता सांडपाणी थेट नदीपात्रात सोडण्यात येते. अनेक कारखान्यांचे रसायनमिश्रीत पाणी रात्रीच्या अंधारात नदीत सोडले जाते, त्याची तीव्र दुर्गंधी परिसरात जाणवते. गाजावाजा करून नालेसफाईची कामे काढली जातात. प्रत्यक्षात कागदी घोडे नाचवून संगनमताने पालिकेची लूटच केली जाते.

> ध्वनी प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन अशा सर्वच बाबतीत पालिकेची उदासीनता आहे. नियोजनशून्य आणि भ्रष्ट कारभारामुळे पर्यावरणाचा सातत्याने बोजवारा उडाला आहे. नद्यांची अवस्था गटारांप्रमाणे बनली आहे. प्रक्रिया न करता सांडपाणी थेट नदीपात्रात सोडण्यात येते. अनेक कारखान्यांचे रसायनमिश्रीत पाणी रात्रीच्या अंधारात नदीत सोडले जाते, त्याची तीव्र दुर्गंधी परिसरात जाणवते. गाजावाजा करून नालेसफाईची कामे काढली जातात.

---

# पिंपळे गुरवमध्ये महिलेवर बलात्कार करून जीवे मारण्याची धमकी

## चार महिलांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल

**। पिंपरी । महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**



घरगुती साहित्य घराबाहेर काढल्याबाबत विचारणा केल्याने महिलेला शिवीगाळ केली. तसेच जीवे मारण्याची व बलात्कार करण्याची धमकी दिली. याप्रकरणी नऊ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. पिंपळे गुरव येथे मंगळवारी (दि. ७) दुपारी तीनच्या सुमारास ही घटना घडली.

याप्रकरणी पीडित महिलेने बुधवारी (दि. ८) सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. रोहन सुभाष चव्हाण (रा. दारूवाला पूल, पुणे), आकाश उर्फ सनी हेमराज बेलखेडे, वसीम अस्लम शेख, शिवम रामतिरत जैस्वाल, राहुल रवींद्र बाविस्कर आणि चार महिलांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे फिर्यादी महिलेच्या घरात जबरदस्तीने घुसून त्यांच्या राहत्या घरातील सामान गोण्यांमध्ये भरून टेरेसवर व जिन्यामध्ये ठेवत होते.

> पीडित महिलेने बुधवारी (दि. ८) सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. रोहन सुभाष चव्हाण (रा. दारूवाला पूल, पुणे), आकाश उर्फ सनी हेमराज बेलखेडे, वसीम अस्लम शेख, शिवम रामतिरत जैस्वाल, राहुल रवींद्र बाविस्कर आणि चार महिलांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## संपादकीय »

# केंद्र सरकारपुढे मोठे आव्हान!

***देशाला धार्मिक तेढ, संघर्ष आणि जातीय दंगली तशा नव्या नाहीत. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरही देशात असे प्रकार अनेकदा घडलेले आहेत. त्याही स्थितीतून देश सावरला. आता पुन्हा एकदा एका विशिष्ट धर्माच्या धार्मिक वास्तूंवर दावे केले जात असल्यानं देशातलं वातावरण गढूळ होताना दिसत आहे. त्यातूनच देशात पुन्हा संघर्षाची ठिणगी पडली आहे.***

दुसरीकडे दहशतवाद्यांनी पुन्हा डोकं वर काढून काश्मीर खोऱ्यात टार्गेट किलींगचं सत्र सुरु करत निष्पापांचे जीव घ्यायला सुरुवात केली आहे. धगधगतं काश्मीर पुन्हा एकदा दहशतवादी कारवायांनी हादरू लागलं आहे. काश्मीरमध्ये ५ ऑगस्ट २०१९ पासून टार्गेट किलिंगची मालिका सुरू झाली आहे. याचदिवशी केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा (३७० कलम) काढून जम्मू-काश्मीरला केंद्रशासित प्रदेश घोषित केले होते. काश्मिरी पंडितांच्या परतीसाठी सरकारने प्रयत्न केले.

त्यांना नोकऱ्या दिल्या आणि राहण्यासाठी घरेही दिली. केंद्र सरकारने हे पाऊल उचलल्यामुळे संतप्त झालेले दहशतवादी टार्गेट किलिंग करत आहेत. ७ मे ला श्रीनगरमध्ये डॉ. अली जान रस्त्यावर दहशतवादी हल्ल्यात पोलीस कॉन्स्टेबल गुलाम हसन डार यांचा मृत्यू झाला. १२ मे ला बडगाममधील चाडूरा तहसील कार्यालयात घुसून कर्मचारी राहुल भटची हत्या करण्यात आली. १३ मे ला पुलवामाच्या गडूरा गावात निःशस्त्र पोलीस कर्मचारी रियाज अहमदचा यांची हत्या करण्यात आली. १७ मे ला बारामुल्लामध्ये दारू दुकानावर ग्रेनेड हल्ला करण्यात आला होता. त्यात राजौरीचे सेल्समन रंजीत सिंहचा मृत्यू झाला. २४ मे ला श्रीनगरमध्ये पोलीस कर्मचारी सैफुल्ला कादरी यांची हत्या करण्यात आली. २५ मे ला बडगाममध्ये टीव्ही अभिनेत्री अमरीन भटची त्यांच्या राहत्या घरातच हत्या करण्यात आली. त्यानंतर ३१ मे ला कुलगामच्या गोपालपोरामध्ये हिंदू शिक्षिका रजनी बाला यांची हत्या करण्यात आली. २ जूनला कुलगाम जिल्ह्यात बँक व्यवस्थापक विजय कुमार यांची गोळी घालून हत्या करण्यात आली.

दहशतवाद्यांनी २६ दिवसांत ८ लोकांची हत्या केली. ९० च्या दशकातील हत्याकांडाच्या थरकाप उडवणाऱ्या स्मृती टार्गेट किलिंगमुळे पुन्हा ताज्या झाल्या आहेत. त्यामुळे काश्मीरपासून जम्मूपर्यंत जनक्षोभ उसळला आहे. जम्मू-काश्मीर खोऱ्यातील काश्मिरी पंडित, हिंदू आणि परराज्यातील नागरिकांना दहशतवाद्यांकडून लक्ष्य करून त्यांच्या हत्या केल्या जात आहेत.



## आनंदी सकाळ

# रघुनायकेविण काज आणिक नाही।'

वारकरी संप्रदायात अठरापगड जातींत संत निर्माण झाले; तसेच समर्थ संप्रदायातही एकापेक्षा एक श्रेष्ठ असे महंत निर्माण झाले. महंतांनी धर्मकारणाबरोबरच समाजकारण व प्रसंगी राजकारणही केले. महंतांचा आध्यात्मिक अधिकारही संतपरंपरेला शोभणारा होता. पट्टाभिषिक्त रामरायाचे वैभवही समर्थांनी खूप वाढवले. 'रघुनायकेविण काज आणिक नाही।' हाच भाव त्यांच्या वृत्तीत वसत होता. त्यासाठी रामदासी हा बलाने व बुद्धीने सतेज असावा, असी समर्थांची धारणा होती. महंतांसी शत्रुत्व घेताना समोरच्याला दहावेळा विचार करावा लागेल, असे सामर्थ्य आणि जरब महंतांच्या ठिकाणी असे. कल्याणस्वामी, उद्धव गोसावी यांसारख्या रामदासींनी तर असामान्य कर्तृत्व जागवले. कल्याणस्वामींनी योगमार्ग, तत्त्वज्ञान; तसेच गुरुसेवा यांत अनन्यसाधारण अधिकार प्राप्त केला. उद्धव गोसावींनी सारंगपूर येथून सातशे दीक्षित रामदासी भक्तांची पलटण उभी करून, ती महाराष्ट्रात आणली. वेण्णास्वामी आणि अक्काबाई यांच्यासारख्या गतवधा स्त्रियांना समर्थांनी मठपती केले. या अधिकारी स्त्रियाही संतकोटीतील म्हणाव्या अशा होत्या.

# वन्यप्राण्यांच्या अधिवासाची काळजीही व्हावी






जंगलांचे क्षेत्र दिवसेंदिवस घटते आहे. वन्यप्राण्यांच्या अधिवासाची काळजीही वारंवार कानी येते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात तीन नवी अभयारण्ये जाहीर करण्याच्या निर्णयाचे स्वागत व्हावे. निसर्गरक्षणाची कळकळ तळागाळात झिरपण्यासाठी हा विषय सोपा करून सांगायला हवा. प्रत्येक राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र राखणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय वनक्षेत्र नियमावलीत तसे नमूद आहे. महाराष्ट्रातील वनक्षेत्राचा टक्का वीसच्या आत आला आहे. राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाल्याने, राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे प्रस्ताव जाईल आणि अभयारण्यांवर तातडीने अंमल होईल. या कामापूर्वी स्थानिकांना विश्वासात घेऊन, त्यांच्या योग्य पुनर्वसनानंतरच पुढे पाऊल टाकण्याच्या सूचना आहेत. संरक्षित क्षेत्रातील नागरिकांची घडी नीट बसविणे, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. देशात १९७३मध्ये सर्वप्रथम नऊ व्याघ्र प्रकल्प जाहीर झाले. त्यात मेळघाट होते. पन्नास वर्षे होत आली असतानाही, मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील आदिवासी गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटलेला नाही. तीन-चार वर्षांपूर्वी तेथे वन विभाग आणि ग्रामस्थांमध्ये मोठा संघर्ष झाला. अन्य ठिकाणचे चित्र फार वेगळे नाही. अभयारण्यांच्या घोषणांमागे निसर्गाची काळजी असली, तरी ग्रामस्थांच्या नैसर्गिक जगण्याचे विस्मरण होऊ न देण्याची खबरदारीही घ्यायला हवी. व्याघ्र प्रकल्पांमुळे परिसरातील ग्रामस्थांवर जंगल प्रवेशापासून इतरही बंधने येतात. त्यातून अनेकांवर गुन्हे दाखल होतात. संयम सुटलेले काही ग्रामस्थ अडवणुकीवर येतात. जंगलांना आगी लावण्यापासून वन्यजीवांच्या शिकारींपर्यंत त्यांची मजल जाते. व्याघ्र प्रकल्पांऐवजी संवर्धन राखीव क्षेत्र जाहीर करणे, हा त्यावरील उपाय असतो.

नव्या निर्णयानुसार १२ संवर्धन राखीव क्षेत्रांचीही घोषणा झाली आहे. राज्यात आतापर्यंत १५ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित करण्यात आली असून, त्यातील आठ क्षेत्रांना मागील दोन वर्षांत मंजुरी मिळाली आहे. अशा संवर्धन राखीव क्षेत्राच्या जंगलात प्रवेश करण्याची ग्रामस्थांना परवानगी असते.

# कार्यकर्त्यांच्या चिंतेची, काँग्रेसला खरी गरज

**भारताच्या स्वातंत्र्यासाठी एक दिशा देणारी संघटना म्हणून स्थापन झालेली "भारतीय राष्ट्रीय काँग्रेस"ही मूळ संघटना स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये मोठ्या प्रमाणात काम करीत महत्त्वपूर्ण नेत्यांच्या दिशादिग्दर्शनाने आणि लोकांच्या विचारातून पुढे जाणारी संघटना, राजकीय पक्ष म्हणूनही प्रभावीपणे काम करू लागली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा त्या काँग्रेस विचारांचाच वसा स्वातंत्र्याच्या लढ्यापासून पुढे घेऊन वाटचाल करीत आहे.**

आज मात्र त्याग आणि बलिदानाच्या पायावर उभा राहिलेल्या काँग्रेसपक्षातील काही नेते दुर्दैवाने पक्षाला सोडून जाऊ लागले आहेत. ज्या नेत्यांना काँग्रेसने त्यांच्या राजकीय क्षितिजाच्या उच्चस्थानी जाण्यास मदत केली त्याच काँग्रेसला सोडण्याचे काम करीत आहेत, मात्र तरीही काँग्रेस शाबूत आहे व राहणार, मात्र या दलबदलू नेत्यांच्या कृतीमुळे निर्माण झालेल्या स्थितीचा विचार करता परिमाम नक्की झाला आहे, सत्ता गमवावी लागली असली तरी काँग्रेसला मानणारा वर्गही कमी नाही तर मोठा आहे, कारण मूळ विचारांचा पाया या काँग्रेसने घातला आहे, हे विसरून चालणार नाही, म्हणूनच काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग ठामपणे काँग्रेसबरोबर आहे, हा वर्ग आहे तो म्हणजे तळागाळातील कार्यकर्त्यांचा..... त्यामुळेच काही लहान-मोठे नेते जरी काँग्रेसमधून बाहेर जात



असले तरी पक्षाच्या ताकदीमध्ये कमतरता येण्याऐवजी कार्यकर्त्यांना मात्र त्याची चिंता वाटू लागली आहे. ज्यांना काँग्रेसने अगदी सरपंचापासून मंत्रीपद, मुख्यमंत्रीपद दिले ते काँग्रेसच हात का सोडतात? हे कार्यकर्त्यांना समजू शकलेले नाही. पण इतके होऊनही काँग्रेस अद्याप ठामपणे उभी आहे ती त्या कार्यकर्त्यांच्या बळावर, ताकदीवर. अलीकडच्या अनेक निवडणुकांमधून ते नेहमी सिद्धही होत आहे आणि अगदी गेल्या ७-८ वर्षांमध्येही जरी काँग्रेसला जो काही राजकीय फटका बसला आहे, त्या काळातही हे अनुभवास आले आहे, ते कार्यकर्त्यांचे सामान्यपण राखून असलेले असामान्य बळ. अशा या असामान्य बळ असलेल्या सामान्यांना काँग्रेसच्या अस्तित्वाला राखण्यासाठी स्वत:च्या खिशालाही कात्री लावून काम करावेसे वाटत आहे, हेच आज काँग्रेस नेतृत्त्वाला अनुभवाला येत आहे.

अगदी महाराष्ट्रातील मोजकी गेल्या दोन निवडणुकी पूर्वीची उदाहरणे द्यायची झाली तर पनवेल, पेण, दहिवडी, इंदापूर, शिर्डी, येथील काँग्रेसचे आमदार विधानसभेच्या ऐन निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस सोडून गेले. जाताना पक्ष संघटना व नगर पंचायत, पालिका, तालुका पंचायत, जिल्हा परिषद अशा महत्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये काम करणारे नेते व काही कार्यकर्ते घेऊन गेले. पक्षाचे जिल्हा अध्यक्ष, तालुका अध्यक्ष, शहर अध्यक्ष सुद्धा घेऊन गेले .

## ।। अभंगवाणी ।।



हासों रुसों आतां वाढवूं आवडी ।
अंतरींची गोडी अवीट ते ॥१॥
सेवासुखें करूं विनोदवचन । आम्ही
नारायण एकाएकीं ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

शॉर्ट न्यूज »



## महाराष्ट्रात मेघगर्जनेसह कोसळणार पाऊस

। मुंबई । महाईन्यूज ।

केरळात नैऋत्य मोसमी वाऱ्यांचं आगमन झाल्यानंतर मान्सूनने कर्नाटक किनारपट्टीच्या बहुतांशी भागात मजल मारली आहे. त्यानंतर गोव्याच्या सीमेवर मान्सून रेंगाळला आहे. वेळेआधीच महाराष्ट्रात मान्सून दाखल होईल, हा हवामान खात्याचा अंदाज देखील चुकला आहे. आता १२ ते १३ जून दरम्यान महाराष्ट्रात मान्सून दाखल होईल, अशी नवीन माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. दरम्यान पुढील काही दिवस कोकणासह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात सर्वत्र पूर्वमोसमी पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.


### राज्यसभा असो या विधानपरिषद असो यातील घोडेबाजाराला कोण बळी पडणार नाही

# राज्यसभेनंतर विधान परिषदेतही आघाडीचे उमेदवार निवडून येतील!

### राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे प्रतिपादन

। मुंबई । महाईन्यूज ।

भाजपने राज्यसभा निवडणुकीत जास्त उमेदवार दिला. मात्र आघाडीचे उमेदवार निवडून येतील आता विधानपरिषदेच्या निवडणूकीतही तयारी करावी लागेल. कंबर कसावी लागेल. महाविकास आघाडीचे उमेदवार राज्यसभेवर सर्व निवडून येतीलच आणि त्याच पावलावर पाऊल टाकून विधानपरिषदेतही आघाडीचे उमेदवार निवडून येतील असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.



राज्यसभा असो या विधानपरिषद असो यातील घोडेबाजाराला कोण बळी पडणार नाही. आमचे सर्व आमदार प्रामाणिक राहतील अशी खात्रीही छगन भुजबळ यांनी यावेळी बोलून दाखवली. पंकजाताई मुंडे यांचे स्टेटमेंट वाचले होते.. दिलेल्या संधीचं सोनं करेन परंतु त्यांना डावलण्यात आले आहे. त्यांना पहिल्या क्रमांकावर उतरता आलं असतं. संधी द्यायला हवी होती. खडसेंच्या बाबतीत तेच झाले होते.

महाविकास आघाडीचे उमेदवार राज्यसभेवर सर्व निवडून येतीलच आणि त्याच पावलावर पाऊल टाकून विधानपरिषदेतही आघाडीचे उमेदवार निवडून येतील असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

### त्या नुपुर म्हणजे भारत नव्हे...

▸▸ कुठल्याही धर्मगुरूविरुध्द बोललं जाऊ नये. अपमानकारक बोललं जाऊ नये. प्रत्येक धर्माचा आदर राखला गेला पाहिजे. हे आपल्या संविधानात लिहिले आहे. आता जे कुणी धमक्या देत आहेत त्यांनी लक्षात घेतले पाहिजे की, हे भारताने केलेले नाही. हे भारतातील एका पक्षाच्या कार्यकर्त्यांने केले आहे. त्याची सजा इतर भारतीयांना नको. एखाद्या पक्षात असे माथेफिरू लोक असतात केवळ प्रसिद्धी मिळावी त्यासाठी काहीजण करत असतात. त्या नुपुर म्हणजे भारत नव्हे... त्या एका पक्षाच्या लहान प्रवक्ता आहेत. त्यांच्यावर पक्षाने कारवाई केली आहे. त्यामुळे अरब इस्लामिक देशातील लोक सहकार्य करतील असेही छगन भुजबळ म्हणाले. कुठल्याही धर्मगुरूविरुध्द बोललं जाऊ नये. अपमानकारक बोललं कृपाशंकर सिंग यांनी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना पत्र लिहून शाळांमध्ये मराठी विषय शिकवला जावा असे म्हटले आहे.

---

### विधानपरिषद निवडणुकीचे बिगूल

# डोईजड होऊ नये म्हणूनच पंकजा मुंडेचा पत्ता कट

### भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने जाहीर केलेल्या उमेदवारी यादीवर फडणवीस यांचे वर्चस्व

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

विधानपरिषद निवडणुकीचे बिगूल वाजल्यावर पंकजा मुंडे यांना विधानपरिषदेवर पाठण्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. देवेंद्र फडणवीस यांनीही पंकजा ह्या कोणत्याही पदासाठी पात्र असून त्यांना विधानपरिषदेसाठी माझा पाठिंबा आहे असे म्हटले होते. मात्र, उमेदवारीचा निर्णय केंद्रीय नेतृत्व घेते हे सांगायला मात्र ते विसरले नाहीत. आता भाजपच्या केंद्रीय नेतृत्वााने जाहीर केलेल्या उमेदवारी यादीवर फडणवीस यांचे वर्चस्व असल्याचे दिसते.

विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपने पाच उमेदवारांची नावे बुधवारी जाहीर केली. विधानसभेतील संख्याबळानुसार भाजपचे पाचही उमेदवार निवडून येणार हे निश्चित आहे. भाजपाने विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी मंत्री राम शिंदे, राज्य भाजपचे उपाध्यक्ष आमदार प्रसाद लाड, भाजप महाराष्ट्राचे संघटन सचिव श्रीकांत भारतीय आणि भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश अध्यक्षा उमा खापरे यांना संधी दिली आहे. विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या माजी मंत्री पंकजा मुंडे यांचे नाव चर्चेत होते. मात्र त्यांना पुन्हा एकदा डावलण्यात माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गटाला यश आले आहे. तर भाजप महिला प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ यांना उमेदवारीची अपेक्षा होती. पण त्यांनाही भाजपने उमेदवारी नाकारली आहे.



भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचे नाव यावेळी चर्चेत होते. पण भाजपने धक्कातंत्राचा अवलंब करत आणि पंकजा यांच्यासह अनेक चर्चेतील नावांचा पत्ता कट करत उमा खापरे यांना संधी दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय झाला आहे. खरे तर पक्षात डोईजड होऊ नये म्हणूनच पंकजा मुंडे यांचा पत्ता देवेंद्र फडणवीस यांनीच कट केल्याचे बोलले जाते. यापूर्वी पक्षांतर्गत आव्हान मिळू शकतील असे जेष्ठ नेते एकनाथ खडसे विनोद तावडे चंद्रशेखर बावनकुळे हे तुल्यबळ नेते होते. मात्र, त्यांचे खच्चीकरण करण्यास फडणवीस यांना यश आले. एकनाथ खडसे यांना तर पक्ष सोडण्यासही भाग पडले. तर विनोद तावडे आता भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस आहेत. त्यामुळे सध्या तरी पंकजा यांच्याशिवाय फडणवीस यांना आव्हान देईल असा नेता प्रदेश भाजपमध्ये उरला नव्हता. त्यामुळे विधानपरिषदेमार्फत पंकजा मुंडे राज्याच्या राजकारणात पुन्हा येणे हे फडणवीस यांच्यासाठी धोक्याची घंटा ठरली असती.

### कुठल्याही चित्रा वाघ यांनाही संधी नाही

▸▸ पंकजा मुंडे यांच्यासह चित्रा वाघ यांच्या नावाचीही जोरदार चर्चा होती. मात्र भाजपाने श्रीकांत भारतीय आणि उमा खापरे यांच्या रुपाने नव्या चेहऱ्यांना संधी देत एकप्रकारे दिग्गज नेत्यांना धक्का दिल्याचं बोललं जात आहे.

### शिस्तबद्ध कार्यकर्ता म्हणून निर्णय मान्य करायचा असतो - चंद्रकांत पाटील

▸▸ याबाबत चंद्रकांत पाटील यांना विचारलं असता ते म्हणाले की,आमच्या पार्टीमध्ये आम्ही सगळी कोरी पाकीटं असतो. जो पत्ता लिहील तो जात असतो. त्यामुळे राजकारणात काम करणारी व्यक्ती आणि त्याच्या चाहत्यांनी इच्छा व्यक्त करायची असते. पण निर्णय हा संघटना करते. विधानपरिषद, विधानसभा, लोकसभा, राज्यसभा हे निर्णय केंद्र सरकार घेते. केंद्राने घेतलेला निर्णय हा सर्वांनी शिस्तबद्ध कार्यकर्ता म्हणून मान्य करायचा असतो. पंकजा ताईंची उमेदवारी व्हावी, यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्यासह आम्ही सगळ्यांनी खूप प्रयत्न केले. पण केंद्राने काहीतरी भविष्यातील विचार केला असेल असं चंद्रकांत पाटील यांनी म्हटले.

भाजपाने प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांना पुन्हा उमेदवारी दिली. तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेले प्रा. राम शिंदे यांचे राजकीय पुर्नवसन करण्यात आले आहे.

## शॉर्ट न्यूज »

### पाकच्या बलुचिस्तानमध्ये वाहन दरीत कोसळून 18 जणांचा मृत्यू

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये वाहन दरीत कोसळल्याने १८ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. ही घटना पाकिस्तानच्या पर्वतीय बलुचिस्तान प्रांतात घडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. डॉन या हिंदी भाषिक वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, जोब या राष्ट्रीय महामार्गावरून जाणारं प्रवासी वाहन किल्ला सैफुल्ला परिसरातील दरीत कोसळलं.

उपायुक्त हाफिज मुहम्मद कासिम यांनी सांगितले की, हे वाहन अख्तरझाईजवळील एका टेकडीच्या माथ्यावरून कोसळले आणि या अपघातात सर्व १८ प्रवासी ठार झाले आहेत. अख्तरझाई हा झोबमधील १,५७२ मीटर उंचीवर वसलेला आदिवासी भाग आहे.

बलुचिस्तानचे मुख्यमंत्री मीर अब्दुल कुदुस बिजेन्जो यांनी मृत आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला आणि जखमींना पुरेशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून

# खरीप पिकांच्या एमएसपीला मंजुरी, मोदी मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय!

## आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या किंमतीत घट

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।

खरीप पिकांसाठी किमान आधारभूत किंमतीला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या मंजुरीमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. २०२२-२३ साठी ही मंजुरी मिळाली असून सध्या २०२१-२२ साठी धानाची एमएसपी १९४० रुपये प्रति क्विंटल आहे. तर, २०२२-२३ साठी २०४० रुपये एमएसपी वाढवण्यात आला आहे. रसायन आणि खते मंत्री मनसुख मांडविया यांनी म्हटलं की, खरीप पिकांसोबतच रब्बी खतांसाठी पुरेसा युरया साठा आहे. हा साठा डिसेंबरपर्यंत पुरू शकतो. त्यामुळे आयात करण्याची गरज नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या किंमतीत घट झाली आहे. येत्या काळात या किंमती आणखी घटणार असल्याचं मांडविया यांनी सांगितलं. मांडविया यांनी सोमवारी सांगितलं की, देशात युरियाचा पुरेसा साठा आह. घरगुती वापरांची पुर्तता करण्यासाठी युरिया मुबलक प्रमाणात आहे. त्यामुळे डिसेंबरपर्यंत आयात करण्याची गरज लागणार नाही. सरकारने आधीच १६ लाख टन युरिया आयात केली आहे. जो



पुढील 45 दिवसांत पाठविला जाईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीत पिकाच्या एमएसपीमध्ये 100 रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आल्याची माहिती अनुराग ठाकूर यांनी दिली. तूरडाळीचा एमएसपी 6600 रुपये प्रति क्विंटल करण्यात आलाय. गतवर्षीपेक्षा यामध्ये 300 रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. तिळाच्या किंमतीत प्रति क्विंटल 523 रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. तर मूग डाळ प्रति क्विंटल 480 रुपयांनी वाढली आहे. सूर्यफूलच्या किंमतीत 358 आणि भुईमूगाच्या किमतीत प्रति क्विंटल 300 रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. डी-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) च्या बाबतीत मांडविया म्हणाले की, देशात खतांचा, विशेषत: युरिया आणि डीएपीचा पुरेसा साठा असून, तो डिसेंबरपर्यंत

मंत्री मनसुख मांडविया यांनी म्हटलं की, खरीब पिकांसोबतच रब्बी खतांसाठी पुरेसा युरया साठा आहे. हा साठा डिसेंबरपर्यंत पुरू शकतो. त्यामुळे आयात करण्याची गरज नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या किंमतीत घट झाली आहे. येत्या काळात या किंमती आणखी घटणार असल्याचं मांडविया यांनी सांगितलं.

पुरेल. शेतकऱ्यांच्या हितासाठी वाजवी दरात खतांची उपलब्धता व्हावी, यासाठी सरकारने अनुदानात वाढ केली आहे. खरीप हंगामाला सुरुवात झाली असून तर रब्बी पिकांची पेरणी ऑक्टोबरमध्ये सुरू होईल.राज्य सरकारांकडे सध्या ७० लाख टन युरियाचा साठा आहे, तर १६ लाख टन युरिया आयात केला जात असून डिसेंबरपर्यंत १७५ लाख टन युरियाचे उत्पादन होईल. ऑक्टोबरमध्ये कार्यान्वित होणाऱ्या बरौनी आणि सिंद्री येथील दोन नव्या प्रकल्पांमधून सहा लाख टन युरिया उपलब्ध होणार असून, आणखी २० लाख टन पारंपरिक युरियाच्या वापराची जागा लिक्विड नॅनो युरियाने घेतली जाईल, अशी माहिती खत मंत्रालयातील एका अधिकाऱ्याने दिली आहे.

# धक्कादायक! मोबाईलवर गेम न खेळू दिल्याने मुलानेच केली आईची हत्या

## लखनऊनच्या पीजीआय परिसरातील घटना

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

लहान मुलांना शांत करण्यासाठी आणि आपली कामे झटपट करण्यासाठी सध्या अनेक पालक आपल्या मुलांच्या हातात मोबाईल देतात. मोबाईलमध्ये विविध प्रकारच्या व्हिडीओच्या माध्यमातून त्यांना शांत करतात. परंतु, हाच मोबाईल आता पालकांसाठी धोकादायक ठरत आहे. याच कारण म्हणजे एका १६ वर्षीय मुलाने मोबाईलवर गेम न खेळू दिल्यामुळे आईची हत्या केली आहे. लखनऊनच्या पीजीआय परिसरात ही घटना घडली आहे.

रविवारी ही घटना घडली. मोबाईल गेम खेळू न दिल्याने मुलाने हत्या केली. त्यानंतर आपल्या १० वर्षीय बहिणीला खोलीत बंद केले आणि हा मुलगा आईच्या मृतदेहाशेजारी बसून राहिला. हत्या केल्यानंतर तब्बल तीन दिवस हा मुलगा आईच्या मृतदेहाशेजारी बसून होता. आईचा मृतदेह कुजून त्यातून दुर्गंध येऊ लागल्यानंतर मुलाने वडिलांनी फोन केला आणि हत्या झाल्याचे सांगितले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तपासाला सुरूवात केली.




मोबाईलमध्ये विविध प्रकारच्या व्हिडीओच्या माध्यमातून त्यांना शांत करतात. परंतु, हाच मोबाईल आता पालकांसाठी धोकादायक ठरत आहे. याच कारण म्हणजे एका १६ वर्षीय मुलाने मोबाईलवर गेम न खेळू दिल्यामुळे आईची हत्या केली आहे.

मुलाच्या आईने मोबाईल गेम खेळण्यापासून थांबवले त्यामुळे रागाच्या भरात त्याने वडिलांची परवाना असणारी पिस्तूल घेतली आणि आईच्या डोक्यात गोळी झाडली. त्यामुळे त्याच्या आईचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर त्याने पिस्तूल तिथेच बेडवर ठेवले आणि १० वर्षीय बहिणीला दुसऱ्या खोलीत बंद केले.हा मुलगा आपली ४० वर्षीय आई साधना आणि १० वर्षीय बहिणीसोबत राहत होता. मुलाचे वडील लष्कर अधिकारी असून कोलकातामध्ये तैनात आहेत. पोलिसांनी याप्रकरणी दिलेल्या माहितीनुसार, मुलगा तीन दिवस आईच्या मृतदेहासोबत घरात बसला होता. दुर्गंध बाहेर जाऊ नये यासाठी तो वारंवार घरात रुम फ्रेशनर मारत होता.

# रिझर्व्ह बँकेच्या धोरणानंतर शेअर बाजार गडगडला, सेन्सेक्स २१४ अंकांनी घसरला

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

रिझर्व्ह बँकने (RBI) आपल्या धोरणांत बदल केल्यानंतर त्याचा परिणाम शेअर बाजारावर झाल्याचं दिसून आलं आहे. रेपो रेट आणि व्याज दरात वाढ केल्यानंतर शेअर बाजार गडगडला आहे. शेअर बाजारात आज सेन्सेक्स २१४ अंकांनी घसरला आहे. तर निफ्टीही ६० अंकांनी घसरली आहे. सेनसेक्समध्ये ०.३९ टक्क्यांची घसरण झाली असून सेन्सेक्स ५४,८९२ अंकांवर बंद झाला आहे. तर निफ्टीमध्येही ०.३७ टक्क्यांची घसरण झाली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेकडून आज नवीन रेपो दर जाहीर करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेने रेपो दरात ५० बेसिस पॉईंटने वाढ केली आहे. सध्या महागाईवर नियंत्रण मिळवण्यावर



रिझर्व्ह बँकेचे प्रमुख लक्ष्य असल्याचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले आहे.

शेअर बाजार बंद होताना आज

भारतीय रिझर्व्ह बँकेकडून आज नवीन रेपो दर जाहीर करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेने रेपो दरात ५० बेसिस पॉईंटने वाढ केली आहे. सध्या महागाईवर नियंत्रण मिळवण्यावर रिझर्व्ह बँकेचे प्रमुख लक्ष्य असल्याचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले आहे.

१५४१ कंपन्यांच्या शेअर्समध्ये वाढ झाली आहे. तर १७३४ कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली आहे. तसेच १२४ कंपन्यांच्या शेअर्समध्ये कोणताही बदल झालेला नाहीये.

आरबीआयच्या नव्या धोरणानुसार आता रेपो दर ४.९० टक्के इतका झाला आहे. त्यामुळे कर्ज महागणार असून ईएमआयदेखील वाढणार आहे. गेल्या महिन्यात बँकेने अचानक व्याजदर वाढवला होता. त्या पार्श्वभूमीवर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी कर्जदारांसाठी रेपो वाढीची घोषणा केली होती.

# ज्ञानवापी मशीद परिसराच्या सर्वेक्षणाचे आदेश देणाऱ्या न्यायाधीशांना धमकी

## तातडीने सुरक्षा व्यवस्थेत वाढ

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ज्ञानवापी मशीद प्रकरणामुळे देशात मागील काही दिवसांपासून वातावरण तापलेले आहे. वाराणसी येथील दिवाणी न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी सुरु आहे. दरम्यान, या खटल्याची सुनावणी घेणार रवी कुमार दिवाकर यांना पत्राद्वारे धमकी देण्यात आली आहे. तसा दावा दिवाकर यांनी केला असून त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात अली आहे.

"कतारने भारताला धडा शिकवला, पण भाजपा..."; पंतप्रधानांचा झालेला अवमान चुकीचा असल्याचे म्हणत शिवसेनेची टीका

न्यायाधीश दिवाकर यांना पत्राद्वारे धमकी मिळाल्यानंतर त्यांनी



याबाबतची माहिती मंगळवारी गृहविभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह), पोलीस महासंचालक (डीजीपी) आणि वाराणसी पोलीस आयुक्तांना दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार काशिफ अहमद सिद्दीकी नावाच्या व्यक्तीने ही धमकी दिली असून हा व्यक्ती इस्लामिक आगाझ चळवळीशी संबंधित आहे. हे पत्र सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. "ज्ञानवापी मशीद परिसराचे सर्वेक्षण ही सामान्य प्रक्रिया वक्तव्य तुम्ही केले आहे. तुम्ही मूर्तीपूजक आहात. तुम्ही मशिदीला मंदीर म्हणून घोषित कराल. मुर्तिपूजक, काफिर आणि हिंदू न्यायाधिशाकडून योग्य निर्णयाची अपेक्षा केली जाऊ शकत नाही," असे या पत्रात म्हणण्यात आले आहे.

मालिकेतील दयाच्या पात्राला अभिनेत्री दिशा वकानीने पुरेपुर न्याय दिला आहे. मालिकेतील दयाच्या स्वभावातील खरेपणा, गोडवा आणि खट्याळ अंदाजाने प्रेक्षकांना वेड लावले आहे. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून दया हे पात्र साकारणारी अभिनेत्री दिशा वकानी मालिकेत दिसून आली नाही.

## काय? 'तारक मेहता का उल्टा चष्मा'मध्ये दयाबेन परत येणार...सुंदरलालने केला खुलासा

हिंदी टेलिव्हिजन वाहिनीवरील सर्वाधिक लोकप्रिय कार्यक्रम 'तारक मेहता का उल्टा चष्मा' मालिकेने गेल्या अनेक वर्षांपासून भारतासह जगभरातील प्रेक्षकांना भुरळ पाडलेली आहे. या मालिकेतील प्रत्येक पात्राने प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. या मालिकेतील मुख्य पात्र जेठालाल आणि दयाच्या जोडीला हिंदी टेलिव्हिजन वरील प्रेक्षकांची लाडकी जोडी आहे. मालिकेतील दयाच्या पात्राला अभिनेत्री दिशा वकानीने पुरेपुर न्याय दिला आहे. मालिकेतील दयाच्या स्वभावातील खरेपणा, गोडवा आणि खट्याळ अंदाजाने प्रेक्षकांना वेड लावले आहे. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून दया हे पात्र साकारणारी अभिनेत्री दिशा वकानी मालिकेत दिसून आली नाही.अभिनेत्री दिशा वाकानीने काही काळासाठी मालिकेतून खूप मोठ्ठा ब्रेक घेतला होता. मात्र आता अनेक दिवसांपासून प्रेक्षक दयाची आतुरतेने वाट पाहत असतानाच आता एक नवी बातमी समोर आली आहे.

मालिकेतील जेठालालची भूमिका साकरणऱ्या अभिनेता दिलीप जोशीने माध्यमांशी बोलताना सांगितले होते की, "त्या परत येणार आहे की नाही हे फक्त प्रोडक्शन हाऊसलाच माहित आहे, आणि मला यात सहभागी नाही व्हायचं". मात्र आता प्रेक्षकांसाठी एक प्रोमो दाखवण्यात आला आहे..



# काजोल सेटवर धडपडली की पिक्चर हीट होतो? सचिन खेडेकर उलगडणार रहस्य

'कोण होणार करोडपती' या कार्यक्रमाचे नवे पर्व नुकतेच सुरू झाले आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्याच आठवड्यात विशेष अतिथी म्हणून भारतीय चित्रपटसृष्टीला पडलेले सुंदर स्वप्न, ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा आणि लाडकी अभिनेत्री काजोल या मायलेकींची गोड जोडी उपस्थित राहणार आहे. 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर




**'कोण होणार करोडपती'च्या मंचावर पहिल्यांदाच ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा आणि लाडकी अभिनेत्री काजोल या मायलेकींची गोड जोडी उपस्थित राहणार आहे.**

पहिल्यांदाच या दोघींमधला अनोखा बंध पाहायला मिळणार आहे. या दोघी जणी 'एबल डिसेबल ऑल पीपल टुगेदर' या संस्थेसाठी 'कोण होणार करोडपती' हा खेळ खेळणार आहेत 'कोण होणार करोडपती' या कार्यक्रमाच्या शनिवारच्या पहिल्याच विशेष भागात ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा, प्रसिद्ध अभिनेत्री काजोल ह्या दोघी सहभागी होणार आहेत. या भागात मायलेकींचे हळुवार बंध, काजोलच्या नावाची गंमत, काजोलच्या लहानपणीचे किस्से अशा अनेक किश्शांचा उलगडा या भागात सचिन खेडेकर यांच्याशी संवाद साधताना होणार आहे. तनुजा आणि काजोल यांच्याबरोबर काजोलचा मित्र लेखक, दिग्दर्शक निरंजन अय्यंगार आणि तनुजा यांची मैत्रीण ज्येष्ठ अभिनेत्री भारती आचरेकर हेही या भागात उपस्थित असणार आहेत. काजोलला 'बाजिगर'च्या सेटवर शाहरूख खान का ओरडला होता, काजोलचा पहिला सिनेमा बघताना तनुजाने तिचा हात घट्ट का धरून ठेवला होता, तनुजा यांच्या 'लग्नाची बेडी' या नाटकाचे अनुभव; अशा अनेक उत्कंठावर्धक गोष्टींनी हा विशेष भाग रंगलेला असल्याने प्रेक्षकांसाठी विशेष पाहुण्यांचा सहभाग असलेला हा पहिला विशेष भाग निश्चितच पर्वणी ठरणार आहे. 'कोण होणार करोडपती'च्या या पर्वातही समाजाच्या कल्याणासाठी झटणाऱ्या सामान्यांमधल्या असामान्य व्यक्तींची भेट आणि त्यांचे कार्य प्रेक्षकांसमोर येणार आहे. या पर्वातील पहिल्याच आठवड्यातील विशेष भागात विशेष पाहुणे म्हणून तनुजा आणि काजोल या सहभागी होणार आहेत. मुंबईतील 'एबल डिसेबल ऑल पीपल टुगेदर' या संस्थेसाठी या दोघी 'कोण होणार करोडपती' हा खेळ खेळणार आहेत. 'कोण होणार करोडपती' या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक सचिन खेडेकर यांनी या पर्वातील पहिल्याच विशेष भागात तनुजा आणि काजोल यांना खुबीने बोलतं केलं आहे. लहानपणीची मस्तीखोर काजोल आईला का घाबरते, तनुजा यांना गुजराती, जर्मन, बंगाली इत्यादी दहा भाषा अस्खलित कशा काय बोलता येतात, त्यांना भाषांची आवड कशी निर्माण झाली, काजोल सेटवर धडपडली की पिक्चर हीट होतो, अशी अफवा सिनेमाक्षेत्रात अनेक वर्ष आहे; त्यामध्ये कितपत तथ्य आहे, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या पहिल्याच विशेष भागात मिळणार आहेत.

# 'सम्राट पृथ्वीराज' बॉक्स ऑफिसवर फ्लॉप

सोनू सूद, सम्राट पृथ्वीराज, सम्राट पृथ्वीराज बॉक्स ऑफिस कलेक्शन, सोनू सूद प्रतिक्रिया, अक्षय कुमार, मानुषी छिल्लर या चित्रपटात सोनू सूदने महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारची प्रमुख भूमिका असलेला 'सम्राट पृथ्वीराज' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई करू शकला नाही. चित्रपटाबाबत बरीच चर्चा सुरु होती, मात्र बॉक्स ऑफिसवर निराशा झाली. आता यावर अभिनेता सोनू सूदने प्रतिक्रिया दिली आहे. या चित्रपटात सोनू सूदने महत्वपूर्ण भूमिका साकारली आहे.

'सम्राट पृथ्वीराज' चित्रपटात सोनू सूद हा चांद बरदाईच्या भूमिकेत आहे. त्याच्या कामाचं कौतुक चाहत्यांकडून होत आहे. हिंदुस्तान टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत सोनू सूदला चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर म्हणावा तितका प्रतिसाद मिळाला नाही याबाबत विचारण्यात आलं. त्यावर उत्तर देताना सोनू सूद म्हणाला की, "हा चित्रपट खास असा आहे. मला यात भूमिका साकारण्याची संधी मिळाली. लोकांनीही खूप प्रेम दिलं. मी माझ्या प्रेक्षकांचे या प्रेमासाठी आभार मानतो."





"चित्रपटाला कदाचित अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळाला नाही. मात्र आम्हाला हे मान्य करायची गरज आहे की कोरोनाच्या साथीनंतर अनेक गोष्टी बदलल्या आहेत. मला विचाराल तर लोकांनी जे प्रेम दिलं त्याबद्दल मी खूप आनंदी आहे." असंही सोनू सूदने म्हटलं आहे.

'सम्राट पृथ्वीराज'ने बॉक्स ऑफिसवर १०.७० कोटी रुपयांसह पहिल्या दिवशी खातं उघडलं होतं. त्यानंतर शनिवारी १२.६० कोटी तर रविवारी १६.१० कोटी रुपये कलेक्शन झालं होतं. पहिल्या आठवड्यात चित्रपटाने ३९.४० कोटींची कमाई केली. आता पुढच्या काही दिवसात किती कमाई करते हे बघावं लागेल. अक्षय कुमारच्या 'सम्राट पृथ्वीराज'च्या तुलनेत कार्तिक आर्यनची 'भूल भुलैय्या २'ची कमाई चांगली होत असल्याचं दिसत आहे.

# आय लव्ह यू! अखेर जहीर इक्बालनं दिली सोनाक्षीसोबतच्या नात्याची जाहीर कबुली

जहीर इक्बालनं त्याच्या इस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली होती ज्याच्या कॅप्शनमध्ये त्यानं सोनाक्षीवर प्रेम करत असल्याचं मान्य केलंय.

बॉलिवूड अभिनेत्री सोनक्षी सिन्हा आणि अभिनेता जहीर इक्बाल मागच्या काही काळापासून सततच्याने चर्चेत आहे. दोघंही एकमेकांसोबत रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा सोशल मीडियावर बऱ्याच काळापासून होताना दिसत आहेत. मात्र दोघांनीही यावर कोणतीही प्रतिक्रिया देणं टाळलं होतं. पण आता सोनाक्षी सिन्हा आणि इक्बाल जहीर यांच्या नात्याचा अखेर खुलासा झाला आहे. इक्बालनं सोशल मीडियावर सोनाक्षीला 'आय लव्ह यू' म्हणत रिलेशनशिपच्या चर्चांना पुष्टी दिली आहे.

जहीर इक्बालनं त्याच्या इस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली होती ज्याच्या कॅप्शनमध्ये त्यानं सोनाक्षीवर प्रेम करत असल्याचं मान्य केलंय. एवढंच नाही तर या पोस्टवर सोनाक्षीनं केलेली कमेंट देखील तेवढीच चर्चेत आहे.

सोनाक्षी सिन्हा आणि जहीर इक्बाल बॉलिवूड सेलिब्रेटी देखील इक्बालनं सोनाक्षीच्या व्हिडीओ इन्स्टाग्रामवर 'वाढदिवसाच्या लव्ह यू... मला न येत्या काळात राहू. प्रेम आणि यांच्या या पोस्टवर सध्या बरेच प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. वाढदिवसानिमित्त एक शेअर केला होता. शुभेच्छा सोनाक्षी... आय मारल्याबद्दल धन्यवाद. आपण असंच खात हास्य सर्वांशी शेअर करू.'

जहीर इक्बालच्या या पोस्टवर सोनाक्षी सिन्हाची कमेंट देखील चर्चेत आहे.



### खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा :

# कबड्डीत महाराष्ट्राच्या मुलींचे रुपेरी यश, मुलांच्या संघानेही मिळवले कांस्यपदक!

## कबड्डीच्या मैदानावर महाराष्ट्राच्या मुलींनी केली रौप्य पदकाची कमाई

**। हरियाणा । महाईन्यूज ।**



हरियाणातील पंचकुला येथे खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील खेळाडूंनी दमदार कामगिरी केली आहे. सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये आज कबड्डीच्या मैदानावर महाराष्ट्राच्या मुलींनी रौप्य पदकाची कमाई केली. सुवर्णपदकासाठी हरियाणाशी झालेली लढत त्यांना जिंकता नाही. महाराष्ट्राच्या संघाचा हरियाणाकडून (४८-२९) १९ गुणांनी पराभव झाला. याशिवाय, मुलांच्या कबड्डी संघानेही कास्य पदकाची कमाई केली आहे.

पंचकुला येथील ताऊ देवीलाल स्टेडियममध्ये सुरू असलेल्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धांमध्ये हरियाणा आणि महाराष्ट्राच्या मुलींच्या संघांदरम्या कबड्डीचा अंतिम सामना झाला. हरियाणाची खेळाडू पूजा हिने केलेल्या चढायांमुळे महाराष्ट्राचा संघ संकटात आला. एक दोन अपवाद वगळता महाराष्ट्राच्या मुलींना अंतिम सामन्यात फार प्रभाव दाखवता आला नाही.

सामन्यातील पहिल्या चढाईतील पहिला बोनस पॉईंट हरियाणाच्या नावे नोंदवला गेला. त्यानंतर महाराष्ट्रानेही पहिल्या चढाईत गुण मिळवला होता. पहिल्या टाईम आउटच्यावेळी दोन्ही संघाचा गुणतक्ता बरोबरीत होता. त्यानंतर मात्र, हरियाणाच्या पूजाने जबरदस्त खेळ करत आपल्या संघाला आघाडी मिळवून दिली.

> सामना संपण्यासाठी सात मिनिटे शिल्लक असताना महाराष्ट्राचा संघ पुन्हा एका सर्वबाद झाला. त्यामुळे हरियाणाला २१ गुणांची भरभक्कम आघाडी मिळाली. शेवटी महाराष्ट्राचा १९ गुणांनी पराभव झाला. अंतिम सामन्यात विजय मिळाल्यामुळे मुलींच्या कबड्डीचे सुवर्णपदक हरियाणाला मिळाले तर रौप्य पदक महाराष्ट्राच्या वाट्याला आले.हिमाचल प्रदेशच्या मुलांच्या संघाने कबड्डी स्पर्धेचे सुवर्णपदक पटकावले

सामन्याचा पहिल्या हापमध्ये महाराष्ट्राचे सर्व खेळाडू बाद झाले. परिणामी हरियाणाला (१८-१२) सहा गुणांची आघाडी मिळाली. महाराष्ट्राच्या हरजीत, यशिका आणि मनिषा यांनी बोनस गुण घेतले. परंतु, तरीही महाराष्ट्राला आघाडी घेता आली नाही. दुसऱ्या हापमधील टाईम आऊटच्या वेळी हरियाणाचे ३३ गुण होते तर महाराष्ट्राचा संघ १९ गुणावर होता. सामना संपण्यासाठी सात मिनिटे शिल्लक असताना महाराष्ट्राचा संघ पुन्हा एका सर्वबाद झाला. त्यामुळे हरियाणाला २१ गुणांची भरभक्कम आघाडी मिळाली. शेवटी महाराष्ट्राचा १९ गुणांनी पराभव झाला. अंतिम सामन्यात विजय मिळाल्यामुळे मुलींच्या कबड्डीचे सुवर्णपदक हरियाणाला मिळाले तर रौप्य पदक महाराष्ट्राच्या वाट्याला आले.

### रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा

# सुवेदचे पदार्पणात द्विशतक

## सर्फराजचे शतक: मुंबईचा 8 बाद 647 धावांचा डोंगर; उत्तराखंड 2 बाद 39 धावा

**। मुंबई । महाईन्यूज ।**



पदार्पणवीर सुवेद पारकरने साकारलेले द्विशतक आणि सर्फराज खानची दीडशतकी खेळी या बळावर मुंबईने रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्यपूर्व सामन्यात ८ बाद ६४७ धावांचा डोंगर उभारत पहिला डाव घोषित केला. त्यानंतर दुसऱ्या दिवसअखेर उत्तराखंडची २ बाद ३९ अशी अवस्था झाली होती.

सुवेदने सोमवारच्या १०४ धावसंख्येवरून मंगळवारी डावाला पुढे प्रारंभ केला आणि ४४७ चेंडूंत २१ चौकार आणि चार षटकारांसह २५२ धावांची मॅरेथॉन खेळी उभारली. ६९ धावसंख्येवरून डावाला पुढे सुरुवात करणाऱ्या सर्फराजने २०५ चेंडूंत १४ चौकार आणि चार षटकारांनिशी १५३ धावा करीत त्याला सुरेख साथ दिली. सर्फराजचे हे प्रथम श्रेणी क्रिकेटमधील सातवे शतक ठरले. या जोडीने चौथ्या गडय़ासाठी २६७ धावांची भागीदारी करताना उत्तराखंडच्या गोलंदाजांना झगडायला लावले. त्यामुळे ४१ वेळा रणजी विजेत्या मुंबईने सामन्यावरील पकड घट्ट केली आहे.

सुवेदने स्वप्निल सिंगच्या गोलंदाजीवर लाँग ऑफला षटकार खेचत आपले द्विशतक पूर्ण केले. रणजी पदार्पणात द्विशतक साकारणारा तो १२वा फलंदाज ठरला आहे. त्याची २५२ ही धावसंख्या द्विशतकवीरांच्या यादीतील चौथ्या क्रमांकाची आणि प्रथम श्रेणी क्रिकेटमधील पाचव्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. मयांक मिश्राच्या गोलंदाजी स्वीप करण्याच्या प्रयत्नात सर्फराज बाद झाल्यानंतर शाम्स मुलानीने ५९ धावांचे योगदान देत सुवेदला साथ दिली. सुवेद आणि मुलानी यांनी सहाव्या गडय़ासाठी १०६ धावा केल्या. त्यामुळे मुंबईला पाचशे धावांचा टप्पा ओलांडता आला. मुलानीच्या खेळीत सहा चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. तनुष कोटियान (२८) आणि तुषार देशपांडे (नाबाद २०) यांनीही सुवेदला साथ दिली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही